| | |
|---|---|
| | **जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी कार्यालय सिंधुदुर्ग**<br>मुख्य प्रशासकीय इमारत, पहिला मजला, ओरोस-सिंधुदुर्गनगरी,<br>ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग, पिनकोड - 416 812<br>दुरध्वनी क्रमांक - 02362 - 228589, फॅक्स क्रमांक - 02362 - 228844 |
| सत्यमेव जयते | **संकेतस्थळ - www.sindhudurg.gov.in** **ईमेल- collroffice@gmail.com** |

क्रमांक गृह.फौज.संहिता/१४४/सुधारणा ४/२०२० दिनांक -२०/०५/२०२०

**वाचले-**

1) फौजदारी प्रकीया संहिता १९७३ चे कलम १४४
2) या कार्यालयाकडील आदेश क्र. गृह. फौज.संहिता/१४४/२०२० दि. २२/०३/२०२०
3) या कार्यालयाकडील आदेश क्र. गृह.फौज.संहिता/कावि ८५/१४४/२०२० दि. २७/०३/२०२०
4) केंद्र शासनाकडील आदेश क्र. 40-3/2020 DM-I(A) दिनांक १५ एप्रिल, २०२०
5) महाराष्ट्र शासनाकडील आदेश NO DMU/2020/CR 92/DisM-1 दिनांक १७ एप्रिल, २०२०
6) महाराष्ट्र शासनाकडील आदेश NO DMU/2020/CR 92/DisM-1 दिनांक १८ एप्रिल, २०२०
7) या कार्यालयाकडील आदेश क्र. गृह.फौज.संहिता/१४४/२०२० दिनांक २१/०४/२०२०
8) महाराष्ट्र शासनाकडील आदेश NO.DMU/2020/C.R.92/DisM-1 दिनांक ०२ व ०३ मे, २०२०
9) या कार्यालयाकडील आदेश क्र. गृह.फौज.संहिता/१४४/सुधारणा ३/२०२० दिनांक ०५/०५/२०२०
10) महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन मंत्रालय मुंबई यांचेकडील अधिसूचना DMU/2020/CR 92/DisM-1 दिनांक 19/05/2020

---

**आदेश**

ज्याअर्थी, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र दिनांक १४ मार्च, २०२० अन्वये कोरोना विषाणू (कोव्हीड १९) चा प्रार्दुभाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ मधील तरतूदींच्या अंमलबजावणीसाठी अधिसूचना निर्गमित करण्यात आलेली आहे, आणि त्याबाबतची नियमावली प्रसिध्द केलेली असून जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हीड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी ज्या उपाय योजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ चे तरतूदीप्रमाणे जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण हे कोणतीही आपत्ती रोखण्यासाठी किंवा आपत्ती विरुध्द प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी सक्षम प्राधिकारी आहेत.

केंद्र शासन यांचेकडून लॉकडाऊनचा चौथा कालावधी दिनांक १७.०५.२०२० पासून ३१.०५.२०२० पर्यंत घोषित केला असून या कालावधीत करावयाच्या कामासंबंधात महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन मंत्रालय मुंबई यांचेकडील अधिसूचना DMU/2020/CR 92/DisM-1 दिनांक 19/05/2020 अन्वये आदेश जारी केलेला आहे. त्याप्रमाणे सिंधुदुर्ग जिल्ह्याकरीता सुधारीत आदेश पारीत करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी मी के. मंजुलक्ष्मी, जिल्हादंडाधिकारी सिंधुदुर्ग मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून संदर्भ क्रमांक ९ च्या आदेशामध्ये बदल करून खालीलप्रमाणे सुधारीत आदेश पारीत करीत आहे. सदर आदेश हा **दिनांक २२.०५.२०२० पासून** अंमलात येईल.

**खालील बाबींना परवानगी असणार नाही**

| | |
|---|---|
| १ | सिंधुदुर्ग जिल्हयाच्या सिमा बंदी आदेशाच्या कालावधीत बंद राहतील. या कालावधीत मालवाहतूक, जिवनावश्यक सेवा / सुविधा, व अत्यावश्यक सेवांसाठी होणारी वाहतूक वगळून उर्वरीत सर्व वाहतूक प्रतिबंधित असेल. |
| २ | आवश्यक नसणा-या कारणांसाठी नागरिकांची जिल्हातंर्गत हालचाल या कालावधीत प्रतिबंधित असेल. |
| ३ | दोन जिल्हयातील व्यक्ती व वाहनांची हालचाल, परवानगी दिलेल्या बाबी वगळून, प्रतिबंधित असेल. वाचले क्रमांक १० च्या आदेशान्वये परवानगी देण्यात आलेल्या संस्था किंवा आस्थापना ०५ किंवा त्यापेक्षा जास्त |

| | |
|---|---|
| | व्यक्तींना एकत्रीत येण्यास प्रतिबंधित करतील. त्याचप्रमाणे सर्व प्रकारची वाहतूक व सार्वजनिक ठिकाणी सामाजिक अंतर व इतर प्रतिबंधात्मक उपाययोजना यांचे पालन केले जाईल. |
| ४ | सर्व शाळा, महाविद्यालये, कोचिंग क्लासेस, प्रशिक्षण संस्था बंद असतील, परंतू Online / Distance Learning साठी प्रोत्साहीत करण्यात यावे. |
| ५ | सर्व हॉटेल, रेस्टॉरंट यासारखे तत्सम सर्व ठिकाणे प्रतिबंधित असतील. (गृह निर्माण सेवा /पोलीस / सरकारी अधिकारी / आरोग्य सेवा कर्मचारी /पर्यटकांसह अडकलेल्या व्यक्ती यांच्या साठी आणि अलगीकरणासाठी वापरल्या गेलेल्या वगळून) परंतू रेस्टॉरंट मधील खाद्यपदार्थांची घरपोच सेवा सुरु राहील. |
| ६ | सर्व सिनेमागृहे, शॉपिंग मॉल, व्यायाम शाळा, जलतरण तलाव, मनोरंजन पार्क, बार आणि ऑडिटोरियम, असेंबली हॉल, चित्रपट गृहे, यासारखी ठिकाणे बंद राहतील. |
| ७ | जिल्हयात घेण्यात येणा-या सभा, मेळावे, सामाजिक कार्यक्रम, राजकीय कार्यक्रम, जत्रा, यात्रा, उरुस, धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम, मनोरंजनाचे कार्यक्रम, शैक्षणिक कार्यक्रम, क्रिडा स्पर्धा व इतर मोठ्या प्रमाणात गर्दी होणारे कार्यक्रम आयोजनास बंदी घालण्यात येत आहे. |
| ८ | सर्व धार्मिक स्थळे / प्रार्थना स्थळे जनतेसाठी बंद असतील. तसेच धार्मिक सभा आयोजित करण्यास बंदी असेल. |
| ९ | ६५ वर्षापेक्षा अधिक वय असणारे, कोमॉर्बीडिटी असणा-या व्यक्ती, गरोदर महिला व १० वर्षापेक्षा कमी वय असणारी लहान मुले अत्यावश्यक व आरोग्यसेवा मिळविण्या खेरीज बाहेर निघणार नाहीत. |
| १० | जिल्हयात उक्त कालावधीत कोणतीही व्यक्ती / नागरिक यांना सायंकाळी ७.०० ते सकाळी ७.०० वाजेपावेतो अत्यावश्यक बाब वगळता अनावश्यकरित्या फिरण्यास, मुक्तपणे संचार करण्यास फौजदारी प्रकीया दंड संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये मनाई असेल. |

**अटी/ शर्ती नुसार खालील बाबी / आस्थापना सुरु राहतील.**

| | |
|---|---|
| १ | वैयक्तीक व्यायामासाठी स्पोर्ट कॉम्प्लेक्स, स्टेडीयम आणि इतर सार्वजनिक रिकाम्या जागा सुरु राहतील. परंतू प्रेक्षक आणि सामुदायिक / गट उपक्रम यांना मुभा नसेल. सर्व व्यायाम आणि उपक्रम हे सामाजिक अंतर (Social Distance) चे नियम पाळून केले जातील. |
| २ | सर्व सार्वजनिक आणि खाजगी वाहतूक फक्त खालीलप्रमाणे अनुज्ञेय राहील. |
| | 1) मोटार सायकल केवळ चालक |
| | 2) तीन चाकी रिक्षा / गाड्या वाहन **१ + २** |
| | ३) चार चाकी वाहन **१ + २** |
| ३ | सर्व मार्केट /दुकाने सकाळी ९.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत सुरु राहतील. उपविभागीय दंडाधिकारी यांनी त्यांचे कार्यक्षेत्रात आठवडा बाजाराचे ठिकाणी अनावश्यक गर्दी होणार नाही व सामाजिक अंतर राखले जाईल अशा प्रकारे नियोजन करावे. परंतू ज्या ठिकाणी गर्दी होईल अथवा सामाजिक अंतर (Social Distance) चे नियम पाळले जात नसतील त्या ठिकाणी संबंधीत उपविभागीय दंडाधिकारी / तालुका कार्यकारी दंडाधिकारी / पोलीस अधिकारी यांनी अशा आस्थापना त्वरीत बंद करण्याची कार्यवाही करावी. |
| ४ | जिल्हा अंतर्गत बस सेवा सामाजिक अंतर व निर्जंतूकीकरण यांच्या अधिन राहून ५० % क्षमतेने सुरु राहतील. |
| ४ | सर्व शासकीय कार्यालये १००% उपस्थितीत सुरु राहतील. (मुद्रांक नोंदणी कार्यालय व उप प्रादेशिक परिवहन कार्यालयासहीत) |
| ५ | सर्व सलून / स्पा सेंटर सुरु राहतील. व्यवसायिकांनी Social Distance व कोव्हीड १९ विषाणू प्रतिबंधात्मक आवश्यक ती खबरदारी घेणे बंधनकारक राहील. |

**सार्वजनिक ठिकाणी घ्यावयाची काळजी**

| | |
|---|---|
| १ | सार्वजनिक ठिकाणी सर्वांनी फेस मास्क / रुमाल वापरणे बंधनकारक राहील. मास्क / रुमाल यांचा वापर न करणा-या व्यक्तींकडून रु. २००/- दंडाची रक्कम महसूल / पोलीस / स्थानिक प्राधिकरण इत्यादी विभागांनी वसूल करुन संबंधित स्थानिक प्राधिकरणाकडे जमा करावी. |
| २ | सार्वजनिक ठिकाणी थुंकणे हा दंडनिहाय अपराध मानण्यात येईल. सार्वजनिक ठिकाणी थुंकल्यास अशा व्यक्तींकडून या कार्यालयाकडील क्र.साशा/कोरोना/प्रतिबंध/०४/२० दिनांक १५/०४/२०२० अन्वये रु. १०००/- दंडाची रक्कम महसूल / पोलीस / स्थानिक प्राधिकरण यांनी वसूल करुन व संबंधित स्थानिक प्राधिकरणाकडे जमा करावी. |
| ३ | सार्वजनिक ठिकाणी दारु, पान, तंबाखू इत्यादी सेवन करण्यास बंदी असेल. |
| ४ | सर्व दुकानावर प्रत्येक व्यक्तीमध्ये ६ फूट अंतर ठेवण्यात येईल. व एकावेळी ५ ग्राहक नसतील. |
| ५ | जिल्हयाबाहेरुन प्रवेश करणा-या प्रत्येक व्यक्तीने आरोग्य सेतू ॲप वापरणे सर्व बंधनकारक असेल. अशा व्यक्ती आरोग्य सेतू ॲप वापरतात अगर कसे याची खातरजमा ग्राम / वॉर्ड समिती यांनी करणेची आहे. |
| ६ | सर्व आस्थापना व कार्यालयामध्ये प्रवेश व बाहेर पडण्याचे ठिकाणी हॅन्डवॉश, सॅनिटायझर इत्यादीची व्यवस्था करावी. तसेच सामाईकपणे हाताळल्या जाणा-या वस्तू (उदा. दरवाज्याची कडी) यांचे वेळोवेळी निर्जंतूकीकरण करावे. |

या व्यतिरिक्त या कार्यालयाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेले आदेश व सूचना या त्यात उल्लेख असलेल्या सर्व निर्बंधासह पुढील आदेश होईपर्यंत तसेच लागू राहतील. सदर आदेशात उल्लेख केलेल्या प्रतिबंधित / सुट देण्यात आलेल्या बाबी या व्यतिरिक्त सर्व बाबी निर्बंधासह लागू राहतील. तसेच वेळोवेळी परिस्थितीचा आढावा घेऊन कोव्हीड १९ चा प्रसार रोखण्यासाठी जे उपाय करणे योग्य वाटेल, त्या त्या वेळी आदेश निर्गमित करण्यात येईल.

ज्या ठिकाणी उपविभागीय दंडाधिकारी यांनी त्यांचे कार्यक्षेत्रात कंटेन्टमेंट झोन/ प्रतिबंधात्मक क्षेत्र घोषित केलेले आहे किंवा यापुढे घोषित करतील तेथे सदरचे नियम लागू राहणार नाहीत. जो भाग नव्याने कंटेन्टमेंट झोन म्हणून आदेशित होईल, त्या भागात सुरु असलेल्या सर्व बाबी बंद ठेवण्यात येवून मा. आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय भारत सरकार यांचे मार्गदर्शक सूचनांमध्ये मुभा देण्यात आलेल्या बाबी / आस्थापना सुरु राहतील.

सदर आदेशाची अंमलबजावणी पोलीस प्रशासन / उपविभागीय दंडाधिकारी / तालुका दंडाधिकारी / गट विकास अधिकारी / संबंधित नगरपालिका / नगरपंचायत/ नगरपरिषद / ग्रामपंचायत व इतर विभागांनी काटेकोरपणे करण्यात यावी. सदर आदेश संपूर्ण सिंधुदुर्ग जिल्हयाच्या सिमा क्षेत्राकरीता लागू राहील. तसेच यापुर्वी पारीत केलेल्या आदेशातील अटी शर्ती तसेच या आदेशातील अटी शर्ती मध्ये काही संभ्रम निर्माण झाल्यास या आदेशातील अटी शर्ती अंतिम असतील. सदर आदेशाचे कोणत्याही व्यक्ती अथवा संघटनांनी उल्लंघन केल्यास त्यांचेविरुद्ध आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ व भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १८८ नुसार असलेला अपराध केला असे मानण्यात येवून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

सदरचा आदेश दिनांक २०/०५/२०२० रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिलेला आहे.

**(के.मंजुलक्ष्मी)**
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**सिंधुदुर्ग.**

प्रति - सर्व नागरिक व आस्थापना सिंधुदुर्ग जिल्हा.
प्रत माहितीसाठी तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

1) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग
2) पोलीस अधिक्षक,सिंधुदुर्ग

3) उपविभागीय अधिकारी कणकवली /कुडाळ / सावंतवाडी
4) तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी (सर्व)
5) उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, सिंधुदुर्ग
6) मुख्याधिकारी सर्व
7) गट विकास अधिकारी सर्व
8) पोलीस निरीक्षक, राष्ट्रीय महामार्ग,
9) जिल्हा माहिती अधिकारी, सिंधुदुर्ग
10) व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई यांजकडे राजपत्रात प्रसिध्दीसाठी